दि. 11 जानेवारी, 2014

# धर्माच्या आधारावर भेदभाव का

अरुण जेटली
विरोधी पक्षनेत, राज्यसभा

आपल्या संविधान निर्मात्यांनी संविधानाचे भाग IV मध्ये शासकीय निती च्या निर्देशांकाचे सिद्धांत तयार केले होते. संविधानाच्या अनुछेद 44 मध्ये असे सांगितले आहे की, "सरकारने भारताच्या प्रत्येक क्षेत्रात सर्व नागरिकांसाठी समान नागरिक संहिता निश्चित केली पाहिजे". समान नागरिक संहितेचा संबंध फक्त नागरिकांच्या अधिकारांशी आहे, धार्मिक रुढी-परंपरा यांच्याशी नाही. मात्र तरीसुद्धा काही लोक भटकले असून असे मानत आहेत की समान नागरिक संहिता त्यांच्या धार्मिक अधिकारांमध्ये हस्तक्षेप करील. आपल्या कायद्याच्या निर्मात्यांनी नागरिक अधिकारांशी संबंध असलेल्या वेगळ्या पर्सनल लॉ ची अनुमती देताना दंडात्मक कायद्यासंदर्भात कोणती सूट दिली नव्हती. गुन्हा तो गुन्हा आहे, मग गुन्हेगाराचा जन्म कुठेही झालेला असो. त्याची धार्मिक भावना त्याला दोषी किंवा निर्दोष ठरवू शकत नाही.

केंद्रिय गृह मंत्री श्री सुशील कुमार शिंदे यांनी घोषणा केली होती की ते सर्व मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहेत की त्यांनी अल्पसंख्याक समुदायाच्या सदस्यांविरोधात दहशतवादाच्या प्रकरणांची समिक्षा करावी. साहजिकच आहे, त्यांच्या डोक्यात फक्त धार्मिक अल्पसंख्याक असणार, भाषाधारी अल्पसंख्याक नाही. ते अपेक्षा करत आहेत की राज्य सरकारने सर्व लोकांसाठी नाही, मात्र अशा काही नागरिकांच्या विरुद्ध असलेल्या प्रकरणातून निपटण्यासाठी समिक्षा समिती स्थापित करावी ज्यांच्यावर दहशतवादाशी संबंधित गुन्हे असल्याचे आरोप लावले गेले आहेत. गृह मंत्र्यांच्या या पावलामुळे औचित्याचे आणि वैधतेबाबतचे काही मौलिक प्रश्नं उपस्थित झाले आहेत.

त्यांचे हे पाऊल स्पष्ट रित्या राजकीय आहे. भारतात अनेक लोकांवर दहशतवादाशी संबंधित गुन्ह्यात शामिल असल्याचे आरोप लावण्यात आले आहेत. गेल्या काही वर्षात बहुसंख्य समुदायाच्या काही सदस्यांवर पण काही प्रकरणात आरोप लावण्यात आले आहेत. देशाच्या अनेक भागात दहशतवादाशी संबंधित गुन्ह्यांप्रकरणी माओवाद्यांवर आरोप लावण्यात आले. पूर्वोत्तर आणि जम्मू-काश्मीर मध्ये काही लोकांच्या विरोधात दहशतवाद विरोधी कायद्याच्या प्रावधानाचा उपयोग केला गेला. पोटा च्या अंतर्गत 2004 च्या आधीची काही प्रकरणे प्रलंबित आहेत. मुख्यत्त्वे करुन बेकायदा हालचाली (निरोधक) कायद्या अंतर्गत मागील काही प्रकरणे आहेत. निवडणुकीआधी फक्त एका खास वर्गासाठी, प्रकरणाची समिक्षा करण्यात येणार आहे. यावरुन असे वाटते की वोट बँकेच्या राजकारणासाठी असे केले जात आहे.

यासारखी पावले म्हणजे स्पष्ट स्वरुपात असंविधानिक आहेत. अनुच्छेद 14 सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार देतो. स्पष्ट आणि विशिष्ट कसोटीच्या आधारे योग्य वर्गीकरण केले जाऊ शकते. याप्रकारची कसोटी स्पष्ट पणे असंविधानिक आहे की दहशतवादाशी संबंधित प्रकरणांची समिक्षा या गोष्टीवर निर्भर आहे की ते कोणत्या धर्माला मानतात किंवा त्यांनी कुठे जन्म घेतला. कोणताही गुन्हा या आधारावर संपत नसतो की गुन्हेगार कोणत्या एका विशेष धर्माचा आहे. केंद्रीय गृह मंत्रालय राज्यांसाठी हे अनिवार्य करत आहेत की त्यांनी एका विशेष धर्माशी संबंधित असलेल्या प्रकरणांचीच समिक्षा करावी. नास्तिक, ईश्वराला न मानणारे आणि हिंदू धर्मावर विश्वास ठेवणा-यांना वास्तविक पाहता यातून बाहेर ठेवले जाईल. तिथे विरोधाभास पण असू शकेल. हिंदू धर्मावर विश्वास ठेवणा-यांची संख्या पूर्वोत्तर राज्य आणि जम्मू-काश्मीर राज्यांमध्ये खुप कमी आहे. का, या राज्यांत समिक्षेसाठी ते सुद्धा हकदार असतील की, या राज्यातील बहुसंख्यकांना राष्ट्रीय अल्पसंख्याक मानले जाईल आणि ते प्रकरणांच्या समिक्षेचे हकदार असतील? त्या प्रकरणांचे काय होईल (माओवाद्यांच्या विरोधात) जिथे सह आरोपी एका धर्माचा आहे आणि अन्य दुस-या समुदायाशी संबंधित आहे. यामध्ये कोणताही संदेह नाही की केंद्रीय गृह मंत्रालयाने जे मानदंड स्वीकारले आहेत ते समानतेच्या संविधानिक गॅरेंटी चे उल्लंघन करतात कारण की, हे तर्क अथवा समजेल अशा कसोटीच्या आधारावर नाहीत.

फौजदारी चा खटला परत घेण्याचा अधिकार अपराधिक प्रक्रिया संहितेच्या अनुच्छेद 321 पर्यंत सीमित आहे. फक्त सरकारी वकील "चांगल्या कारणासाठी" स्वताला तयार केल्यानंतर प्रकरण मागे घेण्यासाठी न्यायालयात जाऊ शकतो. न्यायाधीशांना डोके चालवावे लागेल की, प्रकरण मागे घेण्यासाठी संमती द्यावी अथवा नाही. दंडात्मक कायदा असे कोणतेही लंबीत प्रकरण मागे घेण्यासाठी कोणत्या प्रकारची समिक्षा समितीला मंजुरी देऊ शकत नाही जिथे आरोपपत्र दाखल झाले आहेत. जेव्हा कधी खासदारांना याची आवश्यकता भासली तेव्हा विशेषतः त्यांनी याप्रकारची समीक्षा समिती प्रदान केली आहे. एका अतिरिक्त कायद्याची समीक्षा समिती जी सरकारी वकील आणि न्यायाधीश यांच्या विशेषाधिकारांची जागा घेईल अशी प्रक्रिया स्वीकारेल, ज्यापासून कायदा सुद्धा अपरिचित आहे. हे दंडात्मक कायद्याच्या प्रावधानांचा स्पष्ट उल्लंघन आहे.

केंद्रीय गृह मंत्र्यांची धर्माच्या आधारावर गुन्हेगारांदरम्यान भेदाभेद करण्याच्या राज्यांना दिलेला सल्ला/ निर्देश अनुचित नीति वर आधारित आहे. हे समानतेच्या संविधानिक गॅरेंटी चे उल्लंघन आहे. हे मौलिक सिद्धांत आणि दंडात्मक कायद्याच्या प्रावधानांचे उल्लंघन आहे. गृहमंत्र्यांच्या अशा प्रकारच्या असंविधानिक निर्देशांना मानण्यासाठी राज्ये बांधिल नाहीत.